# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/उदयान/ ९५ /२०२४-२५ दिनांक :- ३० -5- 2024

प्रति,
सिस्टम मॅनेजर
माहिती व तंत्रज्ञान विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय:- वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या / बातम्यांचा खुलासा सादर करणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेकडुन छाटणीच्या नावाखाली झाडांची कत्तल केली जाते याबाबत दै.लोकमत या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमीबाबत वस्तुस्थितीबाबत सोबत जोडलेली प्रेसनोट वृत्तपत्र व मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत :- प्रेसनोट प्रत.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (उदयान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिकेकडुन छाटणीच्या नावाखाली झाडांची कत्तल केली जाते याबाबत दि.26/05/2024 रोजी दै.लोकमत या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमीबाबत वस्तुस्थितीखालिल प्रमाणे आहे.

भाईंदर (प.), भाईंदर पोलिस स्टेशन ते नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान येथिल विवेक ज्वेलर्स समोरील बाजूस या बातमी मधिल नमुद 01 नग कंदबांचे अंदाजे 15 ते 20 फुट उंचीचे झाड मुख्य रस्त्यावर पुणपणे झुकलेले होते. तसेच सहा महिने आधी सदर झाडाच्या बाजुचे झाड जोराच्या वा-याने उन्मळून पडले होते. सबब उपरोक्त झाड ही त्याप्रमाणेच झुकलेले असल्याने धोकादायक झाले होते. सबब जिवित व वित्त हानीसारख्या घटना टाळण्याच्या उद्देशाने प्रतिबंधात्मक उपायायोजना म्हणून सदर झाड काढणेकामी दि.15/04/2024 रोजी साप्ता.मानावाधिकार या वृत्तपत्रात दि.16/04/2024 ते दि.22/04/2024 या कालावधीपर्यंत नागरीकांच्या हरकती व सुचना करीता जाहिर नोटिस सुचना प्रसिद्ध करण्यात आलेली होती. सदर कालावधीत एकही हरकत व सुचना प्राप्त झालेली नव्हती. धोकादायक झाड काढणेबाबतच्या विहित सर्व प्रक्रिया पुर्ण करुन सदर झाड दि.24/05/2024 रोजी मनपा कर्मचा-यामार्फत काढण्यात आलेले आहे.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (उदयान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner